# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ६७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## सोमवार, दि.०३ नोव्हेंबर, २०१४ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ६७ वी बैठक सोमवार, दि.०३ नोव्हेंबर, २०१४ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ३) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ४) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ५) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ६) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ७) | डॉ. देशमुख एम. एस. | सदस्य |
| ८) | डॉ. करचे बी. आर. | सदस्य |
| ९) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १०) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| ११) | श्री. पाटील बी. पी. परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १२) | श्री. अनपट एस. बी. प्र. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १३) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थितीः**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी., व डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. यांनी एस.एम.एस. द्वारे व सौ. मोहिते-पाटील पी. पी. यांनी पत्राद्वारे अनुपस्थिती कळविली. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. प्रा. डॉ. पाटील टी. आर., अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, प्र. सहसंचालक (तं. शि.), तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी व विभागीय सहसंचालिका (उच्च शिक्षण) सोलापूर विभाग हे सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

**सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

आज दि.०३/११/२०१४ रोजी होणाऱ्या ६७ व्या बैठकीचे कामकाजपत्रक दि.२०/१०/२०१४ रोजी पाठविण्यात आले होते. त्यावेळी दि.१८/१०/२०१४ रोजीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांताच्या प्रती व त्यानुसार ठरावावर कार्यवाही करण्याकरिता संबंधित विभागांना पुरेसा वेळ नसल्यामुळे त्या बैठकीचा कार्यवृत्तांत आणि ठरावावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तसेच मा. कुलगुरुमहोदयांचा अहवाल दि.०३/११/२०१४ च्या बैठकीच्या कामकाजपत्रकासोबत पाठविण्यात आले नव्हते.

आजच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार, दि.१८/१०/२०१४ च्या बैठकीच्या कार्यवृत्तांत बैठकीसमोर ठेवण्यात आला. तो वाचून कायम करण्यात आला. त्याचप्रमाणे दरम्यानच्या काळात बराचसा कालावधी हा दिवाळी सुट्टीचा असल्याने मा.कुलगुरुमहोदयांचा अहवाल निरंक असल्याचे मा.कुलगुरुमहोदयांनी बैठकीत सांगितले. त्यानुसार, विषयपत्रिकेत दर्शविलेल्या विषय क्र. १ ऐवजी विषय क्र. ३ पासून सुरुवात करुन त्यानुसार सर्व विषयाचे अनुक्रम बदलण्यात आले. तर दि.१८/१०/२०१४ च्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार ठरावावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीवेळी देण्याचे ठरले.

वरीलप्रमाणे झालेल्या चर्चेनुसार, खालीलप्रमाणे विषयाची पुनर्रचना करण्यात आली.

**[ ०१ ] दि.१८ ऑक्टोबर, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठरावः दि.१८ ऑक्टोबर, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.**

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठरावः मागील बैठकीपासून या बैठकीपर्यंतच्या कालावधीत जास्तीत जास्त सुट्टयांचा कालावधी असल्याने मा.कुलगुरुमहोदयांनी त्यांचा अहवाल निरंक असल्याचे सांगितले, त्याची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**[ ०३ ] सोलापूर विद्यापीठात एल.एल.बी. (पाच वर्ष कोर्स) च्या अंतिम वर्षाच्या अभ्यासक्रमात विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने येणा-या स्नातकास "स्वर्गीय मेघराज काडादी स्मृती सुवर्णपदक" देणेकरिता तयार करण्यात आलेल्या नियमावलीचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(टिपणी**: दि.०२/०९/२०१४ व दि.१२/०९/२०१४ रोजीच्या पत्रान्वये श्री. धर्मराज काडादी, सचिव, श्री. संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, सोलापूर यांच्याकडून देणगी रक्कम रु.१,००,०००/- विद्यापीठास प्राप्त झाली आहे. त्यानुसार दि. २३/०९/२०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र.१० नुसार सुवर्णपदकांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर देणगीच्या व्याजातून सोलापूर विद्यापीठात एल.एल.बी. (पाच वर्ष कोर्स) च्या अतिम वर्षाच्या अभ्यासक्रमात विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने येणाऱ्या स्नातकास "स्वर्गीय मेघराज काडादी स्मृती सुवर्णपदक" या नावाने पुरस्कार देण्याकरिता नियमावलीचा मसुदा १) डॉ. सुर्यवंशी एस. एस. २) ॲड. सलगर बी. एस. या समितीने तयार करुन दिलेला आहे.

सबब, शै.वर्षे २०१४-१५ पासून सोलापूर विद्यापीठात एल.एल.बी. (पाच वर्ष कोर्स) च्या अंतिम वर्षाच्या अभ्यासक्रमात विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने येणाऱ्या स्नातकास "स्वर्गीय मेघराज काडादी स्मृती सुवर्णपदक" या नावाने पुरस्कार देण्याकरिता तयार करण्यात आलेला नियमावलीचा मसूदा विचारार्थ).

**ठराव : सोलापूर विद्यापीठात एल. एल. बी. (पाच वर्ष कोर्स) च्या अंतिम वर्षाच्या अभ्यासक्रमात विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने येणाऱ्या स्नातकास "स्वर्गीय मेघराज काडादी स्मृती सुवर्णपदक" देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या नियमावलीच्या मसुद्यास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**२) पान क्र. ५ वर, Eligibility अंतर्गत असलेल्या मुद्दा क्र. २ ऐवजी "Student must complete the course in five years" अशी दुरुस्ती करावी.**

**[ ०४ ] सोलापूर विद्यापीठात एम.ए (समग्र मराठी) प्रथम व व्दितीय वर्षात एकूण गुणात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस "डॉ. निर्मलकुमार फडकुले सुवर्णपदक" व बी. ए. (भाग-१, २ व ३ ) मराठी विषयात एकूण गुणांत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस "श्रीमती मंदाकिनी निर्मलकुमार फडकुले सुवर्णपदक" देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या नियमावलीचा मसूदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(**टिपणी**: दि.१६/०९/२०१४ रोजीच्या पत्रान्वये प्रा. डॉ. अजित निर्मलकुमार फडकुले, विवेक, ४/१०, विद्यानगर, उत्तर सदर बझार, सोलापूर यांच्याकडून देणगी रक्कम रु.२,००,०००/- विद्यापीठास प्राप्त झाली आहे. त्यानुसार दि.२३/०९/२०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र.१३ (२) नुसार सुवर्णपदकांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर देणगीच्या व्याजातून सोलापूर विद्यापीठात एम.ए (समग्र मराठी) प्रथम व व्दितीय वर्षात एकूण गुणात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस "**डॉ. निर्मलकुमार फडकुले सुवर्णपदक**" व बी. ए (भाग-१, २ व ३) मराठी विषयात एकूण गुणांत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस "**श्रीमती मंदाकिनी निर्मलकुमार फडकुले सुवर्णपदक**" या नावाने पुरस्कार देण्याकरिता नियमावलीचा मसूदा १) ॲड. सलगर बी. एस. २) डॉ. देशमुख एम. एस. या समितीने तयार करुन दिलेला आहे.

सबब, शै.वर्षे २०१४-१५ पासून सोलापूर विद्यापीठात एम. ए. (समग्र मराठी) प्रथम व व्दितीय वर्षात एकुण गुणात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस "डॉ. निर्मलकुमार फडकुले सुवर्णपदक" व बी. ए. (भाग-१, २ व ३ ) मराठी विषयात एकूण गुणांत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस "श्रीमती मंदाकिनी निर्मलकुमार फडकुले" या नावाने पुरस्कार देण्याकरिता तयार करण्यात आलेला नियमावलीचा मसूदा विचारार्थ).

ठराव : **सोलापूर विद्यापीठात एम.ए (समग्र मराठी) प्रथम व व्दितीय वर्षात एकूण गुणात सर्वप्रथम येणा-या विद्यार्थी/विद्यार्थीनीस "डॉ. निर्मलकुमार फडकुले सुवर्णपदक" व बी. ए. (भाग-१, २ व ३ ) मराठी विषयात गुणानुक्रमे सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस "श्रीमती मंदाकिनी निर्मलकुमार फडकुले सुवर्णपदक" देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या नियमावलीच्या मसूद्यास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**पान क्र. ६ वर, Eligibility अंतर्गत असलेल्या मुद्दा क्र. २ ऐवजी "Student must complete the course in three years" अशी दुरुस्ती करावी.**

**पान क्र. ७ वर, Eligibility अंतर्गत असलेल्या मुद्दा क्र. २ ऐवजी "Student must complete the course in two years" अशी दुरुस्ती करावी.**

**[ ०५ ] सोलापूर विद्यापीठामध्ये बी. ए. भाग-१, २ व ३ उर्दू या विषयात एकूण गुणात सर्व प्रथम येणाऱ्या स्नातकास सुवर्णपदक देण्याकरिता प्रा. मोहम्मद हनीफ इस्माईल खैरदी यांनी रु.१,००,०००/- (एक लक्ष) देणगी दाखल सादर केलेल्या पत्राबाबत व सुवर्णपदक नियामवलीमध्ये सदरची बाब समाविष्ट करण्याबाबत विचारार्थ.**

**(टिपणी :** प्रा. मोहम्मद हनीफ इस्माईल खैरदी, खैरदी निवास, १०/३, विद्या नगर, उत्तर सदर बझार, सोलापूर यांनी त्यांच्या पत्रात सोलापूर विद्यापीठात बी. ए. भाग-१, २ व ३ उर्दू या विषयात विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने येणाऱ्या स्नातकास सुवर्णपदक देण्याचा मानस असून हे सुवर्णपदक **"प्रा. मोहम्मद हनीफ इस्माईल खैरदी सुवर्णपदक"** या नावाने विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभावेळी स्नातकास प्रदान करण्यात यावे, याकरिता प्रा. मोहम्मद हनीफ इस्माईल खैरदी यांनी रु.१,००,०००/- (अक्षरी रु.एक लक्ष) देणगीदाखल देवू इच्छितात. सदरच्या रक्कमेच्या व्याजातून प्रतिवर्षी वरील सुवर्णपदक देण्यात यावे. तथापि, दहाव्या दीक्षांत समारंभात सदरचे सुवर्णपदक देण्याकरिता आवश्यक तो खर्च प्रा. मोहम्मद हनीफ इस्माईल खैरदी स्वतः करण्यास तयार आहेत. उक्त प्रमाणे देणगी स्विकारुन "प्रा. मोहम्मद हनीफ इस्माईल खैरदी सुवर्णपदक" चालू करण्याची बाब विचारार्थ.

सदर सुवर्णपदकासाठी नियमावली तयार करण्याकरिता समिती गठीत करणे आवश्यक असल्याने समिती सदस्यांच्या नामनिर्देशनास्तव.

प्रा. मोहम्मद हनीफ इस्माईल खैरदी यांनी देवू केलेली देणगी स्विकारण्याची बाब महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मधील कलम २८ (ज) नुसार तथा समिती सदस्यांच्या नामनिर्देशनार्थ विचारार्थ).

**ठराव: सोलापूर विद्यापीठामध्ये बी. ए. भाग-१, २ व ३ उर्दू या विषयात गुणानुक्रमे सर्व प्रथम येणाऱ्या स्नातकास सुवर्णपदक देण्याकरिता प्रा. मोहम्मद हनीफ इस्माईल खैरदी यांनी दिलेली रु.१,००,०००/- (एक लक्ष) देणगी स्विकारुन हे सुवर्णपदक आगामी दीक्षांत समारंभापासून देण्यास व या सुवर्णपदकाची नियमावली तयार करण्याकरिता प्राचार्य श्री. पवार एस. के. व प्रा. डॉ. सुर्यवंशी एस. एस. यांची समिती गठीत करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर कार्यालयाने तयार केलेली उत्तरे व सदरची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः अधिसभा सदस्यांनी दि.१५ नोव्हेंबर, २०१४ रोजी होणाऱ्या बैठकीकरिता प्रश्न पाठविलेले आहेत. सदर प्रश्नांची उत्तरे कार्यालयाने तयार केलेली आहेत. परिनियम ४७६ (८) नुसार सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी द्यावयाची आहेत.

सबब, अधिसभेच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची कार्यालयाने तयार केलेली उत्तरे विचारार्थ व सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशनास्तव विचारार्थ).

**ठराव: सोबत जोडल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे दुरुस्त करण्यात आली व अधिसभेमध्ये त्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

# अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर विद्यापीठ प्रशासनाने तयार केलेली उत्तरे

| | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| ● | **डॉ. श्रीमती रेवडकर बी. डी.** | | **ॲड. श्री. सलगर बी. एस.** |
| | १ | महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ३२-६(A) नुसार गठित केलेली प्रमाद समिती बदलेली आहे काय? | होय. |
| | २ | असल्यास नवीन प्रमाद समिती कोणत्या कायद्याच्या आधारे गठित केली आहे काय? | महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १४/७ नुसार मा. कुलगुरु सो यांच्या अधिकारात परीक्षा मंडळाच्या वतीने गठित केलेली आहे. |
| | ३ | प्रमाद समितीचे सदस्य कोणकोण आहेत? | १. मा. प्राचार्य आर. वाय पाटील (अध्यक्ष)<br>कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूर<br>२. मा. डॉ. श्रीमती एस. आर. याजमान्य (सदस्य)<br>डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर<br>३. मा. डॉ. ए. एस. पाटील (सदस्य)<br>ब्रह्मदेवदादा माने अभियांत्रिकी महाविद्यालय, बेलाटी.<br>४. मा. डॉ. शाम तोडकरी (सदस्य)<br>संगमेश्वर कॉलेज, सोलापूर<br>५. मा. प्रा. आर. एस. मेंते (सदस्य)<br>संगणकशास्त्र संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर |
| ● | **श्री. चौगुले एस. एस.** | | **प्राचार्य श्री. पवार एस. के.** |
| | १ | सन २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षात कोणकोणत्या संशोधन मार्गदर्शकाकडे (जे २०१५ ला सेवानिवृत्त होतात) संशोधक विद्यार्थी दिलेले नाहीत? | १) डॉ. श्रीमती पवार व्ही. यु.<br>२) डॉ. दिक्षीत एस. के.<br>३) डॉ. माणिकशेटे ए. एच.<br>४) डॉ. अन्यापन्यावर आर. व्ही.<br>५) प्रा. डॉ. नारायणपेठकर ए. बी.<br>६) डॉ. शिरश्याड व्ही. एस.<br>७) डॉ. कोनापुरे बी. एस.<br>८) डॉ. पाटील आर. आर.<br>९) डॉ. श्रीमती बावचकर एस. एन.<br>१०) डॉ. पवार एस. ए.<br>११) डॉ. पडवळ एस. एल.<br>१२) डॉ. मोरे टी. एस. |
| | २ | कोणत्या अधिकारमंडळाने हा निर्णय घेतला? | मा. कुलगुरुंच्या दि.१५/१०/२०१३ रोजीच्या आदेशान्वये |
| | ३ | हा निर्णय घेतला असल्यास निर्णय घेण्यापूर्वी त्याची नियमावली तयार केली आहे काय? | पीएच. डी. नियमावली तयार केली आहे. |
| ● | **श्री. गायकवाड एस. पी.** | | **प्रा. डॉ. सुर्यवंशी एस. एस.** |
| | १ | सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षात रसायनशास्त्र या विषयात पात्रता धारक संशोधक विद्यार्थ्यांची (D. R. C. ने मान्य केलेल्या) नोंदणी का होऊ शकली नाही? | सदर शैक्षणिक वर्षामधील रसायनशास्त्र या विषयातील संशोधक विद्यार्थ्यांचे प्रस्तावित संशोधक मार्गदर्शक नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. तसेच ते त्यावेळेस शिक्षक म्हणून कार्यरत नसल्याने सदर विद्यार्थ्यांची नोंदणी झाली नाही. |
| | २ | सेवानिवृत्त झालेल्या विद्यापीठीय प्राध्यापकास प्रभारी परीक्षा नियंत्रक म्हणून नेमणूक कोणत्या कायद्याने केली? | व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार. |

| | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| ● | **श्री. गायकवाड आर. एस.** | | **प्राचार्य श्री. पवार एस. के.** |
| | १ | सोलापूर विद्यापीठात सहा. प्राध्यापकासाठी Good Academic Record ची व्याख्या काय आहे? | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून २०१० च्या अधिसुचनेतील क्र.४.४.१ मधील तरतुदीनुसार **Good academic record as defined by the concerned university** with at least ५५% marks (or an equivalent grade in a point scale wherever grading system is followed) at the Masters Degree level in a relevant subject from an Indian university or an equivalent degree from an accredited foreign university. याप्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेता.<br>● शिवाजी विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या आरक्षण संदर्भातील महत्वाचे व निवडक शासकीय आदेश या पुस्तकातील शिक्षक भरतीबाबतची कार्यवाही या मुद्दयानुसार मुलभूत अर्हता धारण करणाऱ्या म्हणजेच पदवी परीक्षेत किमान ४५ टक्के व पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५ टक्के गुण आवश्यक आहेत.<br>● याबाबत महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २२-०७-२००४ रोजीच्या राजपत्रात खालील प्रमाणे नमुद केले आहे.<br>**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी केलेले परिनियम, अध्यादेश, विनियम आणि नियम यांचे, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचेकडून अधिनियमाखाली अधिकारांचा वापर करुन अधिक्रमण करण्यात येईपर्यंत किंवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत, ते अंमलात असणे चालू राहील आणि ते उक्त अधिनियमान्वये सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून करण्यात असल्याचे मानण्यात येईल.**<br>उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता सोलापूर विद्यापीठास सहाय्यक प्राध्यापकासाठी गुड ॲकेडेमिक रेकॉर्ड म्हणजे पदवी परीक्षेत ४५ टक्के व पदव्युत्तर परीक्षेत ५५ टक्के गुण आवश्यक आहेत. |
| | **डॉ. पवार एन. बी.** | | **डॉ. शिळीमकर टी. एन.** |
| | १ | सोलापूर विद्यापीठातंर्गत संलग्नित महाविद्यालयामध्ये सेवेत असलेल्या प्राध्यापकांना पीएच.डी. संशोधनाकरिता स्वतंत्र २०% जागा राखीव ठेवलेल्या आहेत का? | नाही. |

| | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | २ | इतर विद्यापीठामध्ये उदा. नांदेड, औरंगाबाद, पुणे इ. ठिकाणी सेवेमधील प्राध्यापकांना स्वतंत्र जागा राखीव ठेवलेल्या आहेत. तरी आपण याबाबत काय कार्यवाही करणार आहात? | नमुद केलेल्या विद्यापीठाकडून माहिती घेवून पुढील कार्यवाही करण्याचा विचार करता येईल. |
| | ३ | आपल्या विद्यापीठामध्ये मागील सिनेट व ॲकॅडेमिक कौन्सिलमध्ये संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापकांना राखीव जागा ठेवण्याबाबत ठराव झालेला असताना सुद्धा त्याची कार्यवाही का झाली नाही? | सदरचा ठराव दि.२४/०४/२०१४ रोजीच्या विद्यापरिषदेमध्ये ठेवला असता विद्या परिषदेने अमान्य केला आहे. |
| | **डॉ. कोळेकर टी. एन** | | **श्री. गायकवाड बी. आर.** |
| | १ | अल्पसंख्यांक संस्थेच्या महाविद्यालयाच्या शिक्षक निवड समितीची विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार रचना कशा पध्दतीची असावी? | अल्पसंख्यांक संस्थेच्या महाविद्यालयाच्या शिक्षक निवड समितीची विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार रचना खालीलप्रमाणे आहे.<br>1. Chairperson of the Governing Body of the college or his/her nominee from among the members of the Governing body to be the Chairperson of the Selection Committee.<br>2. The Principal of the College.<br>3. Head of the Department of the concerned subject in the College.<br>4. In case of colleges notified / declared as minority educational institutions, 2 nominees of the Chairperson of the college from out of a panel of five names, preferably from minority communities, recommended by the Vice Chancellor of the affiliating university from the list of experts suggested by the relevant statutory body of the college, of whom one should be a subject expert.<br>5. In case of colleges notified/declared as minority educational Institutions, 2 subject experts not connected with the University to be nominated by the Chairperson of the Governing Body of the College out of the panel of five names, preferably from minority communities, recommended by the Vice Chancellor from the list of subject experts approved by the relevant statutory body of the College.<br>6. An academician representing SC/ ST/OBC/ Minority/Women/Differently-abled categories, if any of candidates representing these categories is the applicant, to be nominated by the Vice Chancellor, if any of the above members of the selection committee do not belong to that category.<br>A. To constitute the quorum for the meeting, five of which at least two must be from out of the three subject-experts shall be present. |

| | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | | | B. For all levels of teaching positions in Government colleges, the State Public Services Commissions / Teacher Recruitment Boards must invite three subject experts for which the concerned University, be involved in the selection process by the State PSC.<br>C. For all levels of teaching positions in Constituent colleges of a university, the selection committee norms shall be similar to that of the posts of departments of the university. |
| | २ | वालचंद समुहातील महाविद्यालयात UGC च्या नियमाप्रमाणेच शिक्षकांची निवड करुन विद्यापीठाने मान्यता दिली आहे काय? | होय. |
| | ३ | UGC च्या नियमामधे बदल करुन शिक्षक निवडीच्या प्रक्रियेस मान्यता दिली असल्यास सदर बदलास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेतलेली आहे काय? | लागू नाही. |
| | **डॉ. शिंदे एस. व्ही.** | | **डॉ. शिळीमकर टी. एन.** |
| | २ | सन २०१३ ते २०१५ या शै. वर्षात कोणकोणत्या विभागीय संशोधन समित्या (D.R.C.) बदल करण्यात आला? असल्यास बदल करण्याचे कारण कोणते? | सन २०१३ ते २०१४ या शै. वर्षात खालील विभागीय संशोधन समित्यात बदल करण्यात आला आहे.<br>१. रसायनशास्त्र २. समाजशास्त्र ३. प्राणीशास्त्र<br>४. भूगोल ५. संगणकशास्त्र ६. मानसशास्त्र<br>७. शिक्षणशास्त्र ८. इतिहास ९. ए.आय.एच.सी. ॲन्ड ए.<br>१०. ग्रंथालय व माहितीशास्त्र ११. वनस्पतीशास्त्र<br>१२. मराठी १३.वाणिज्य १४.उर्दू १५. सिव्हील इंजिनिअरींग<br>१६.इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग<br>१७.मेकॅनिकल इंजिनिअरींग<br>व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ३०-०३-२०१० च्या बैठकीतील ठराव क्र.६ प्रमाणे पीएच. डी. प्रवेशासाठी तोंडी मुलाखत व विद्यार्थी वाटप करण्यासाठी खालीलप्रमाणे विभागीय संशोधन समितीची रचना केलेली आहे.<br>Dean of the Concerned Faculty -Chairman<br>Chairman, BOS in the concerned Subject - Member<br>Director/Professor of the Concerned School- Member<br>Two subject experts from same or related subject- Member<br>one subject experts from each research centre - Member<br>उक्त रचनेनुसार व Ad-hoc बोर्ड संपुष्टात आल्याने व अभ्यास मंडळाचे अध्यक्ष नव्याने नियुक्त झाल्याने उक्त समित्यात बदल करण्यात आला आहे.<br>विषय तज्ज्ञांना संबंधित विषयाच्या बैठकीवेळेस मा. कुलगुरु महोदय यांचे आदेशानुसार आमंत्रित केले जाते. |
| | ३ | विद्यापीठातील विविध शैक्षणिक संकुलाचे रुपांतर विभागामध्ये करण्याबद्दल कोणते प्रयत्न केले आहेत. | प्रस्तुत विद्यापीठातील शैक्षणिक संकुलप्रणालीचे अनुदानित पदव्युत्तर अधिविभागात रूपांतर करण्यासाठी दिनांक १९ ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये सहा तज्ज्ञांची समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने संकुलप्रणालीचे रुपांतर पदव्युत्तर अधिविभागात करण्याबाबत विद्यापीठास अहवाल सादर केला. |

| | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | | | सदर अहवाल विद्यापीठाच्या दिनांक २४/०४/२०१४ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या व दिनांक २४/०६/२०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर केला असता, सर्वानुमते स्विकारून, अहवाल शासनास सादर करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.<br>सदर अहवाल दिनांक २२/०८/२०१४ रोजी मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांचेकडे पाठविण्यात आला. त्यांनी दिनांक २२/०८/२०१४ रोजीच्या पत्रान्वये शिफारसीसह मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडे सादर केलेला आहे. |
| | **<u>डॉ. भिलेगावकर एस. डी.</u>** | | **<u>श्री. गायकवाड बी. आर.</u>** |
| | १ | सन २०१३-२०१४ व २०१४-१५ या शैक्षणीक वर्षात कोणकोणत्या महाविद्यालयात पूर्वी, स्थगित केलेल्या प्रवेशास; प्रवेश देण्यास मान्यता दिली आहे? | एकूण २२ महाविद्यालयांचे विद्यार्थी प्रवेश पूर्ववत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर महाविद्यालयांची यादी खालीलप्रमाणे आहे.<br>**शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून विद्यार्थी प्रवेश पूर्ववत केलेल्या महाविद्यालयांची यादी**<br>**<u>शिक्षणशास्त्र महाविद्यालये</u>** |

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव |
|---|---|
| १ | जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| २ | जय जगदंबा एम.एड महाविद्यालय, वैराग, ता.बार्शी, जि. सोलापूर |
| ३ | श्री. सचिन टी. पाटील शिक्षणशास्त्र महाविद्यालय, रुई, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| ४ | श्री. स्वामी समर्थ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी, जि. सोलापूर |
| ५ | श्री. स्वामी समर्थ एम.एड्. महाविद्यालय, बार्शी, जि. सोलापूर |
| ६ | श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| ७ | शिक्षणशास्त्र महाविद्यालय, माढा. ता. माढा, जि. सोलापूर |
| ८ | माऊली शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वडाळा, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर |
| ९ | श्री. विठ्ठल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गुरसाळे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर |
| १० | बळीरामदादा बनसोडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चळे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर |
| ११ | राजाराम भोसले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, करोळे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर |
| १२ | पार्वती ताड शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर |
| १३ | बबनरावजी शिंदे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर |

| | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | | | **कला, वाणिज्य, विज्ञान व समाजकार्य महाविद्यालये**<br>१४ अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय, वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर<br>१५ समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस, जि. सोलापूर<br>१६ बी. बी. ए. व बी. सी. ए. महाविद्यालय, माढा, ता. माढा, जि. सोलापूर<br>१७ बी.बी.ए., बी.सी.ए. महाविद्यालय, अक्कलकोट, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर<br>१८ भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशल वर्क, जुना एम्प्लामेंट चौक, सोलापूर<br>१९ कर्मवीर औदुंबर पाटील विधी महाविद्यालय, जुना कराड नाका, पंढरपूर, जि. सोलापूर<br>**शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून विद्यार्थी प्रवेश पूर्ववत केलेल्या महाविद्यालयांची यादी**<br>१ कै. आमदार काकासाहेब साळुंखे-पाटील आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज, जवळे, ता. सांगोला, जि. सोलापूर<br>२ शरदचंद्र पवार कला वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर<br>३ यशवंतभाऊ पाटील महाविद्यालय, भोसे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर |
| | २ | प्रवेश स्थगीत करताना घातलेल्या अटी कोणत्या होत्या व पुनर्प्रवेश देताना घातलेल्या अटींची पुर्तता केली आहे काय? | प्रवेश स्थगित करताना घातलेल्या अटी खालीलप्रमाणे आहेत. प्रवेश पूर्ववत करताना संबंधित महाविद्यालयांनी अटींची पूर्तता केली आहे.<br>● **<u>प्रवेश प्रतिबंधित केलेल्या महाविद्यालयांनी पूर्तता न केलेल्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.</u>**<br>१. नियमित प्राचार्यांची नियुक्ती केलेली नाही.<br>२. विद्यापीठ विहित निवड समितीमार्फत नियमित शिक्षकांची नियुक्ती केलेली नाही.<br>३. महाराष्ट्र शासनाच्या, शासन निर्णयान्वये महाविद्यालय स्थापनेपासून पाच वर्षात नॅक मुल्यांकन व पुढील पाच वर्षात पुनर्मुल्यांकन करुन घेणे अनिवार्य असताना ही कोणतीही कार्यवाही केलेली नाही.<br>४. शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या महाविद्यालयांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीसंदर्भात बायोमेट्रिक मशिनचा अहवाल सादर केलेला नाही.<br>५. विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना - २००९ व विद्यापीठ अधिनियम १९९४ अन्वये विविध अभ्यासक्रमाच्या नियुक्त स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या संलग्निकरणाच्या अटींची पूर्तता केलेली |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | नाही. |

| | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | | | • शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन राष्ट्रीयकृत बँकेमार्फत केले जात नाही.<br>• शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तके अद्यावत नाहीत.<br>• शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन दिले जात नाही.<br>• अभ्यासिकेत फर्निचरची सोय नाही.<br>• महिला प्रसाधन गृहात सोयी सुविधांचा अभाव आहे.<br>• ग्रंथालयात इंटरनेटरची सोय नाही.<br>• डेडस्टॉक रजिस्टर अद्यावत नाही.<br>• आयकर, व्यवसायकर, ई.पी.एफ. यांचा भरणा योग्य त्या खात्यात केलेला नाही.<br>• विद्यार्थी संख्येच्या मानाने वाचन कक्ष अद्यावत नाही.<br>• कर्मचाऱ्यांच्या ई.पी.एफ. सुरु केलेला नाही.<br>• विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची पुरेशी सोय नाही.<br>• शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या नियमाप्रमाणे नाही.<br>• विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची सोय नाही.<br>• महाविद्यालय विद्यापीठ फी आकारणीचे फी पावती रेकॉर्ड ठेवत नाही व ऑडिटमध्ये नोंद घेत नाही.<br>• संगणक कक्षामध्ये विद्यार्थ्यांसाठी इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही.<br>• विद्यार्थी मंडळ, लैंगिक छळ समितीचे गठण नियमाप्रमाणे नाही.<br>• **<u>प्रवेश प्रतिबंधित महाविद्यालयांचे खालील बाबीस अनुसरुन प्रवेश पूर्ववत करण्यात आले आहेत.</u>**<br>• ज्या महाविद्यालयांनी तत्कालीन परिस्थितीमध्ये प्राचार्य व नियमित शिक्षकांची नियुक्ती केलेली आहे, अथवा प्राचार्य व नियमित शिक्षक निवड करण्याची विहित प्रक्रिया पूर्ण करुनही प्राचार्य व नियमित शिक्षक मिळाले नाहीत परंतु स्थानिक चौकशी समितीने सुचविलेल्या इतर अटींची पूर्तता केलेली आहे अशा महाविद्यालयांकडून सहा महिन्यांच्या मुदतीत सदरची पदे भरण्याबाबतचे हमीपत्र घेवून सदर महाविद्यालयांचे विद्यार्थी प्रवेश पूर्ववत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.<br>• तसेच विद्यार्थी प्रवेश पूर्ववत करतेवेळी शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या महाविद्यालयांना नियुक्त केलेल्या शिक्षकांच्या प्रमाणात विद्यार्थी प्रवेशास मान्यता देण्यात आली आहे. |

| | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | | | • तसेच सन २००१ पूर्वी सुरु असलेल्या पारंपारिक महाविद्यालयांना शासनाने अनुदान देण्याचे धोरण विचारात घेवून विद्यापरिषदेच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार महाविद्यालयांनी सादर केलेल्या पूर्ततेचा आढावा घेवून व अटी पडताळणी समितीच्या शिफारशीन्वये अटीपूर्ततेबाबत हमीपत्र घेवून प्रवेश पूर्ववत केलेले आहेत. |
| | ३ | कोणकोणत्या अनुदानित महाविद्यालयात प्राचार्य निवड समितीची बैठक होवून सुध्दा नियमीत प्राचार्य भरलेले नाहीत? | खालील महाविद्यालयात प्राचार्य निवड समितीची बैठक होवून सुध्दा नियमित प्राचार्य पद भरलेली नाही.<br>१) संगमेश्वर कॉलेज, सोलापूर<br>२) डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर |
| • | **डॉ. बाड डी. आर.** | | **प्रा. डॉ. सुर्यवंशी एस. एस.** |
| | १ | सोलापूर विद्यापीठाची संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता असलेल्या मार्गदर्शकांना संशोधन विद्यार्थी घेण्यासाठी सबंधित मार्गदर्शकाच्या महाविद्यालयात 'संशोधन केंद्र' असणे आवश्यक आहे काय? | होय. |
| | २ | आतापर्यंत संशोधन केंद्र नसणाऱ्या महाविद्यालयातील मार्गदर्शकांना विद्यार्थी देण्यात आले आहेत काय? असल्यास किती व कोणत्या मार्गदर्शकांना. | १. नाही.<br>२. लागू नाही |
| | उपप्रश्न | जर एखादया महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने संशोधन केंद्र घेण्याचे टाळल्यास सबंधीत महाविद्यालयातील संशोधक मार्गदर्शकाला विद्यार्थी देण्यासाठी काय व्यवस्था आहे? | संबंधित महाविद्यालयातील संशोधक मार्गदर्शकाला विद्यार्थी वितरीत केले जात नाहीत. |
| | **डॉ. चव्हाण सी. एस.** | | **प्राचार्य श्री. पवार एस. के.** |
| | १ | पदोन्नतीने (P.B.S. Cas) ने A.G.P. ८००० चे ९००० मध्ये प्रवेश करण्याकरिता थर्ड क्रायटेरियाचा A.P.I. हा U.G.C. च्या नियमा प्रमाणे किती असावा? | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ३० जून २०१० च्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार Category III (API) प्रतिवर्षी १५ व तीन वर्षाच्या Assessment Period करिता ४५ असावा. |
| | ३ | पदवीस्तरावर अर्धवेळ सेवा केलेल्या प्राध्यापकाचा अनुभव संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता देताना धरला जातो का? | नाही. |

## मा.कुलगुरुमहोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषयः

**[ ७(१) ] विद्यापीठाच्या वतीने पात्र स्नातकांना देण्यात येणाऱ्या पदवी प्रमाणपत्रामध्ये संबंधित महाविद्यालयाचे नाव छपाई करण्याची परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणीः विद्यापीठाच्या वतीने पात्र स्नातकांना देण्यात येणाऱ्या पदवी प्रमाणपत्रामध्ये संबंधीत महाविद्यालयाचे नाव छपाई करण्याची बाब परीक्षा मंडळाच्या दि.२९ ऑक्टोबर, २०१४ च्या बैठकीत विचारार्थ ठेवली असता खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

| | |
|---|---|
| **विषय क्र.(२)** | **विद्यापीठाच्या वतीने पात्र स्नातकांना देण्यात येणा-या पदवी प्रमाणपत्रामध्ये संबंधीत महाविद्यालयाचे नाव छपाई करण्याची बाब परीक्षा मंडळाच्या विचारार्थ.** <br> **(सहपत्र ४३)** <br> (टिपणी- टिपणीः प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने पात्र स्नाताकांना देण्यात येणा-या पदवीप्रमाणपत्रामध्ये संबंधीत विद्यार्थ्याचे महाविद्यालयचे नाव छपाई करण्याचा विषय परीक्षा मंडळाच्या बैठकीत सादर करण्याकरीता मान्यतेस सादर. <br> "विद्यापीठाच्या वतीने पात्र स्नाकांना देण्यात येणा-या पदवी प्रमाणपत्रामध्ये संबंधीत महाविद्यालयाचे नाव छपाई करून घेणे बाबत"). |

| | |
|---|---|
| **ठरावः** | **विद्यापीठाच्या वतीने पात्र स्नातकांना देण्यात येणा-या पदवी प्रमाणपत्रामध्ये संबधित महाविद्यालयाचे नाव छपाई करण्यास मान्यता देवून सदरची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात यावी असे ठरले.** |

विद्यापीठाच्या वतीने पात्र स्नातकांना देण्यात येणा-या पदवी प्रमाणपत्रामध्ये संबंधीत महाविद्यालयाचे नाव छपाई करण्या बाबतची परीक्षा मंडळाची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः विद्यापीठाच्या वतीने पात्र स्नातकांना देण्यात येणाऱ्या पदवी प्रमाणपत्रामध्ये संबंधित महाविद्यालयाचे नाव छपाई करण्याची परीक्षा मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ७(२) ] ICT समितीच्या दि.२७/१०/२०१४ रोजीच्या इतिवृत्तानुसार कार्यवाही करण्याची बाब मान्यतेसाठी.**

(टिपणी: श्री. राजेश अग्रवाल समितीने परीक्षेच्या कामकाजात ICT चा उपयोग करण्यासंदर्भात सुचविलेल्या उपाययोजनांवर कार्यवाही करण्यासाठी दिनांक १९ ऑगस्ट २०१४ रोजीच्या मा. व्य. प. ठराव क्र.१४(२) अन्वये या शिफारशींची अंमलबजावणी परीक्षा विभागामार्फत टप्याटप्याने करण्यात यावी तसेच या शिफारशीतील काही कामे ही अत्यंत गोपनीय व संवेदनशील असल्याने सदरचे कामकाज कोणाकडून करुन घ्यावे व या कामकाजाचे दर काय असावे हे ठरविण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना देण्याबाबतचा ठराव पारीत करण्यात आलेला होता.

तसेच वरील ठरावाच्या अनुषंगाने या शिफारशीची अंमलबजावणी करण्याकरिता मा. परीक्षा मंडळाच्या दि.०२/०९/२०१४ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.११ अन्वये ICT समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीच्या दि.०४/०९/२०१४, १८/०९/२०१४, १३/१०/२०१४ व दि.२७/१०/२०१४ अशा सभा झालेल्या आहेत.

ICT समितीच्या दि.२७/१०/२०१४ रोजी झालेल्या समितीच्या इतिवृत्तानुसार ऑक्टोबर-२०१४ या परीक्षेपासून अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखेअंतर्गत अभ्यासक्रमांच्या परीक्षेकरीता Barcode उत्तरपत्रिकेचा वापर करण्यात यावा व या उत्तरपत्रिकेचे स्कॅनिंग व प्राध्यापकांने तयार केलेल्या गुणयाद्यांचेही स्कॅनिंग करण्यात यावे याकरीता सदरचे कामकाज हे मे. टीआरएस फॉर्म्स ॲन्ड सर्व्हिसेस प्रा. लि. चेनई यांच्याकडून करण्यात येवून ३६ पानांच्या प्रति उत्तरपत्रिकांसाठी ८.३० रु व २० पानांच्या प्रति उत्तरपत्रिकांसाठी रु.६.००/- व स्कॅनिंग करीता ४.५० पैसे प्रति उत्तरपत्रिका या दराने करण्यात यावी अशी शिफारस करण्यात आलेली आहे.

सबब, वरीलप्रमाणे सदरची व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर).

**ठराव: ICT समितीच्या दि.२७/१०/२०१४ रोजीच्या इतिवृत्तानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तथापि, परीक्षा नियंत्रकांनी लेखासंहितेच्या नियमाची पुर्तता करावी व मा.कुलगुरुंना अहवाल / हिशोब सादर करावेत. अशा प्रकारची नावे गोपनीय असल्याने अशा आर्थिक व्यवहारास मा.कुलगुरुंनी मान्यता द्यावी असे सर्वानुमते ठरले.**

**[ ७(३) ] प्राचार्य श्री. एस. के. पवार यांचे परीक्षा केंद्रावरील प्राचार्यांना मानधन देण्याची मागणी करणारे पत्र विचारार्थ.**

(टिपणीः मा. राज्यपाल महोदयांनी महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठाकरीता शै.वर्ष २००२-०३ पासून सामाईक अध्यादेश मान्य केला आहे. त्यामधील अध्यादेश क्र. (Ordinance no.8) मधील अ. क्र.५ मधील तरतूदीन्वये परीक्षा विभागाकडून जा.क्र. सोविसो / परीक्षा/ २०१४-१५, दि.१७/१०/२०१४ रोजीच्या परिपत्रकातील अ.क्र.४ नुसार **"चिफ कंडक्टर"** म्हणून काम पाहतील असे आदेश देण्यात आले आहेत.

त्याअनुषंगाने, मा. प्राचार्य पवार एस. के., व्यवस्थापन परिषद, सदस्य यांनी सोबत जोडलेल्या पत्रान्वये अशी विनंती केली आहे की, संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना परीक्षेच्या कामकाजासाठी **"चिफ कंडक्टर"** म्हणून काम करण्याचे आदेश दिले आहेत. परीक्षेचे गांभीर्य व जबाबदारी ओळखून परीक्षा केंद्रावरील प्राचार्यांना **"चिफ कंडक्टर"** चे मानधन मिळण्याची बाब मा. व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः याबाबतीत इतर विद्यापीठाकडून माहिती घेवून हा विषय परीक्षा मंडळाच्या विचारार्थ ठेवावा व त्यांची शिफारस घ्यावी असे सर्वानुमते ठरले.**

**[ ७(४) ] मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या दि.२९/१०/२०१४ च्या पत्रान्वये, शासन परिपत्रक दि.१९ एप्रिल १९९७ नुसार कार्यवाही करण्याबाबत कळविले असल्याने श्री. चव्हाण आनंद मारुती व श्री. बनसोडे सुशिल श्रीनिवास यांची नावे वेतनपत्रकातून वगळून वेतनदेयक सादर केलेने त्यांचे माहे ऑक्टोबर २०१४ चे वेतन देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि. २६ ऑगस्ट, २०१४ अन्वये प्रस्तुत विद्यापीठातील 'गट अ/ब' मधील अधिकारी / कर्मचा-यांच्या वेतन अनुदान निर्धारणाबाबतचे प्राप्त झालेले पत्र दि. २३ सप्टेंबर, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवले असता, त्यावर व्यवस्थापन परिषदेने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

"शासनाकडून अहवालाची प्रत मागवून घ्यावी. अ. क्र. ९ व १० बाबत कायदेशीर अभिप्राय घेवून त्यानुसार कार्यवाही करावी. यानुसार दोन्ही कृती तातडीने आणि एकाच वेळी सुरु कराव्यात त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली ".

विधी तज्ज्ञांच्या अभिप्रायानुसार, श्री. आनंद मारुती चव्हाण यांना विद्यापीठ संदर्भ क्र.सोविसो/आस्था/२०१४/७४२३, दि.२८ ऑक्टोबर २०१४ व श्री. सुशिल श्रीनिवास बनसोडे यांना विद्यापीठाचे पत्र संदर्भ क्र. सोविसो/आस्था/२०१४/७४२४, दि.२८ ऑक्टोबर २०१४ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

परंतु, मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या दि.२९/१०/२०१४ च्या पत्रान्वये, शासन परिपत्रक दि.१९ एप्रिल १९९७ नुसार, मान्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनाशिवाय इतर कर्मचाऱ्यांचे वेतन, वेतन खात्यातून आदा करु नयेत असे नमूद केले आहे.

सबब, मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या दि.२९/१०/२०१४ च्या पत्रान्वये, शासन परिपत्रक दि.१९ एप्रिल १९९७ नुसार कार्यवाही करण्याबाबत कळविले असल्याने, श्री. चव्हाण आनंद मारुती व श्री. बनसोडे सुशिल श्रीनिवास यांची नावे वेतनपत्रकातून वगळून वेतनदेयक सादर केलेने त्यांचे माहे ऑक्टोबर २०१४ चे वेतन देण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **श्री. आनंद मारुती चव्हाण, सिस्टीम ॲनालिस्ट व श्री. सुशिल श्रीनिवास बनसोडे, प्रोग्रामर यांचे माहे ऑक्टोबर २०१४ व तद्नंतर त्यांच्या सेवा समाप्त करेपर्यंतचे वेतन विद्यापीठ निधीतून देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.**

**तसेच संबंधिताचे वेतन हे अनुभव नसताना नियुक्ती या कारणामुळे वेतन नामंजूर झाल्यामुळे, यांच्या वेतनाबाबतची जबाबदारी निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**१) प्राचार्य श्री. पवार एस. के. (अध्यक्ष)**
**२) ॲड. श्री. सलगर बी. एस. (सदस्य)**
**३) श्री. गायकवाड बी. आर. (सदस्य)**

**[ ७(५) ] शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलासाठी सहायक प्राध्यापकांची तात्पुरती पदे संबंधित संकुलातील कार्यभाराचा आढावा घेवून निर्माण केली असून, Walk in Interview व्दारे महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम ७७ मधील तरतूदीनुसार भरती प्रक्रीया पूर्ण केलेली बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र संकुल, पदार्थविज्ञान संकुल, संगणकशास्त्र संकुल, सामाजिकशास्त्रे संकुल, भूशास्त्र संकुल, वाणिज्य व व्यवस्थापन संकुल व शिक्षणशास्त्र संकुल यांना मागील शैक्षणिक वर्षाप्रमाणे संबंधित संकुलातील सुरू असलेल्या सर्व अभ्यासक्रमांच्या कार्यभाराचा आढावा घेवून, नियमित अध्यापकांचा कार्यभार वगळता उर्वरित कार्यभाराच्या अध्यापनाकरिता, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम ७७ मधील तरतूदीनुसार स्थानिक निवड समितीची बैठक आयोजित करून Walk in Interview व्दारे उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत. स्थानिक निवड समितीच्या शिफारशीनुसार निवड झालेल्या उमेदवारांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता कंत्राटी सहायक प्राध्यापक या पदावर एकत्रित वेतनावर नियुक्ती आदेश पारित करण्यात आले आहेत. निवड झालेल्या उमेदवारांचा सारांश सोबत जोडलेल्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सविनय सादर).

**ठराव: शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता, संबंधित संकुलातील कार्यभाराचा आढावा घेवून निर्माण करण्यात आलेली व Walk in Interview द्वारे महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम ७७ मधील तरतूदीनुसार, करण्यात आलेल्या भरती प्रक्रियेची नोंद घेण्यात आली.**

**[ ७(६) ] दि. १९/०९/१९९१ ते ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त झालेल्या परंतु नेट / सेट अर्हताधारक नसलेल्या सहाय्यक प्राध्यापकांचे करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) पाचवा व सहावा वेतन आयोगानुसार संलग्नित महाविद्यालयांकडून प्रस्ताव मागवून स्थाननिश्चितीसाठी संदर्भीत व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिलेली दि.०१/११/२०१४ रोजीचे पत्र विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी :- प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे दि. ०१/११/२०१४ रोजीचे पत्र अवलोकन व्हावे.

उक्त पत्रान्वये मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांच्या दि. २१/०२/२०१४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार व मा. सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांच्या निर्णयास अधीन राहून दि.१९/०९/१९९१ ते ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त झालेल्या परंतु नेट/सेट अर्हता नसलेल्या सहाय्यक प्राध्यापकांचे पाचव्या व सहाव्या वेतन आयोगानुसार करिअन ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS)अंतर्गत स्थाननिश्चितीसाठीचे प्रस्ताव संबंधित महाविद्यालयांकडून मागवून घ्यावेत असे कळविले आहे.

सोबत :- १. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे पत्र.

२. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे पत्र.

**ठराव: माहिती एकत्रित करण्यास लागणारा वेळ लक्षात घेता, सर्व संबंधित महाविद्यालयाकडून माहिती एकत्रित करुन महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करावी, असे सर्वानुमते ठरले.**

**[ ७(७) ] श्री हनुमान शिक्षण प्रसारक संस्था संचलित समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस या महाविद्यालयातील प्रवेशीत विद्यार्थ्याचे पात्रता अर्ज व शुल्क तसेच परीक्षा फॉर्म विहित मुदतीत विद्यापीठास सादर केले नसल्याकारणाने आकारण्यात येत असलेली दंडाची रक्कम माफ करणेसंदर्भात संबंधीत संस्थेने केलेली विनंती विचारार्थ.**

(टिपणी:- श्री. हनुमान शिक्षण प्रसारक संस्था,माळशिरस या संस्थेच्या समीर गांधी कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पात्रता व परीक्षा आवेदन पत्र वेळेत सादर न केल्याने त्यांना भरावी लागणारी दंडात्मक रक्कम माफ करण्याबाबत संस्थेचे जनरल सेक्रेटरी यांनी दिनांक २०/१०/१४ रोजी विनंती अर्ज केलेला आहे.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस येथे एकुण ११७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. सदर विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज अतिरिक्त विलंब शुल्कासह विद्यापीठाकडे सादर करण्याचा शेवटचा दिनांक १५/०९/२०१४ असा होता परंतु संबंधीत महाविद्यालयाने नमुद केलेल्या दिनांकापर्यंत पात्रता अर्ज व त्यासंदर्भातील शुल्क ऑनलाईन माध्यमातून विद्यापीठाकडे भरलेले नव्हते. संबंधित महाविद्यालयातील एकुण विद्यार्थी संख्या विचारात घेता अतिरिक्त विलंब शुल्क प्रति विद्यार्थी रु.८२५/- (७५+७५०) प्रमाणे ११७ विद्यार्थ्यांचे एकुण पात्रता शुल्क रु.९६,५२५/- इतके होते. सदरचे शुल्क स्विकारण्यास मा. कुलगुरु महोदयांनी दिनांक १९/१०/२०१४ रोजी मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने सदरची रक्कम संबंधीत महाविद्यालयाने विद्यापीठाकडे दिनांक २०/१०/२०१४ रोजी रोखीने भरणा केली आहे.

प्रस्तुत विद्यापीठाकडील परिपत्रक क्रमांक ५ नुसार अतिरिक्त विलंब शुल्काच्या दिनांक १५/९/२०१४ पासून दिनांक १९/१०/२०१४ पर्यंत एकूण ३४ दिवसाचे प्रतिदिनी रु.५०/- प्रमाणे प्रति विद्यार्थी १७००/- इतके शुल्क होते. त्यामुळे प्रति विद्यार्थी रु.१७००/- नुसार एकूण ११७ विद्यार्थ्यांचे रु. १,९८,९००/- इतकी दंडाची रक्कम होत आहे.

त्याचप्रमाणे परीक्षा विभागाकडील परिपत्रकान्वये प्रसिध्द केलेल्या विहित मुदतीत परीक्षा फॉर्म भरले नसल्याकारणाने त्यापोटी देखील एकूण ११७ विद्यार्थ्यांची प्रति दिन रु.५००/- प्रमाणे दिनांक १९/१०/२०१४ पर्यंत दंडाची रक्कम रु.१४,९५,९२०/- इतकी होत आहे. त्यापैंकी सदर महाविद्यालये रु.५५२००/- इतकी रक्कम भरणा केली असून उर्वरित १४,४०,७२०/- इतकी दंडाची संबंधित महाविद्यालयाकडून येणेबाकी आहे.

परंतु सदर संस्थेने दिनांक २०.१०.२०१४ रोजीच्या पत्रान्वये आमचे संस्थेचे महाविद्यालय हे विना अनुदानित असून ग्रामीण भागातील आहे आणि त्यातील प्रवेशित विद्यार्थी देखील ग्रामीण भागातील असून त्यातील ८० टक्के विद्यार्थी हे मागास प्रवर्गातील आहेत. त्यामुळे दंडाची रक्कम विद्यापीठाकडे भरणे शक्य नसून ती रक्कम माफ करावी अशी विनंती विद्यापीठास करण्यात आली आहे.

सबब, उक्त वस्तुस्थिती विचारात घेता श्री हनुमान शिक्षण प्रसारक संस्था, माळशिरस यांनी दिनांक २०.१०.२०१४ रोजीच्या पत्रान्वये परीक्षा फॉर्म व पात्रता अर्जासंदर्भातील (पात्रता अर्जाची दंडाची रक्कम रु.१,९८,९००/- + परीक्षा फॉर्मची दंडाची रक्कम रु.१४,४०,७२०/-अशी मिळून रु.१६,३९,६२०/-इतकी) दंडाची रक्कम माफ करणेबाबत विद्यापीठास केलेली विनंती विचारार्थ).

**ठराव:** **श्री. हनुमान शिक्षण प्रसारक संस्था संचलित समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस हे महाविद्यालय, विनाअनुदानित व ग्रामीण भागातील असल्याने व प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ८०% विद्यार्थी हे मागास प्रवर्गातील असल्याने, या महाविद्यालयाने पात्रता व परीक्षा अर्ज विहीत मुदतीत विद्यापीठास सादर न केल्यामुळे, पात्रता शुल्क दंडापोटी भरलेले रु.९६,५२५/- व परीक्षा अर्ज दंडापोटी भरलेले रु.५५,२००/- लक्षात घेवून, त्यांना भरावा लागणारा दंड (पात्रता शुल्कापोटी रु.१,९८,९००/- आणि परीक्षा अर्जापोटी रु.१४,४०,७२०/- असे एकूण रु.१६,३९,६२०/-) माफ करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**अभिनंदनाचा ठराव :**

अधिसभा सदस्य श्री. सी. बी. पाटील यांची सहकार व पणन आणि सार्वजनिक बांधकाम या खात्याच्या कॅबिनेट मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **सचिव** | **अध्यक्ष** |
| **व्यवस्थापन परिषद** | **व्यवस्थापन परिषद** |